स्थापना १९५२ नोंदणी क्रमांक २०२७२

# दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई

**म्युनिसिपल बँक भवन, २४५, पी.डि'मेलो रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.**

**मुंबई, दिनांक : १६.०८.२०२४**

# नोटीस

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई यांची बाहत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ रोजी, सायंकाळी ५.०० वाजता श्री शिवाजी मंदिर, न. चिं. केळकर पथ, दादर (प.), मुंबई-४०० ०२८ येथे खालील कामकाजांचा विचार करण्याकरीता आयोजित करण्यात आली आहे:-

१) दिनांक १८.०८.२०२३ रोजी झालेल्या ७१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे.

२) संचालक मंडळाने सादर केलेल्या वार्षिक अहवालास व वैधानिक हिशेब तपासनीसांनी तपासलेले दि.३१ मार्च २०२४ अखेरचे नफा-तोटा पत्रक व ताळेबंद यांस मान्यता देणे.

३) दिनांक ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीकरीता वैधानिक हिशेब तपासनीस यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेणे व सन २०२२-२०२३ च्या वैधानिक हिशेब तपासणी अनुपालन अहवालाची नोंद घेणे.

४) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या नामतालिकेमधील, भारतीय रिझर्व्ह बँकेने मंजूरी दिलेल्या वैधानिक लेखा परिक्षकाची नोंद घेणे.

५) नफा वाटणीस मंजूरी देणे.

६) बँकेची वसुल न होणारी कर्जे बुडित व अनिश्चित कर्जे निधी (BDDR) खात्यास नांवे टाकून निर्लेखित करणे.

७) बँकेचे पोटनियम क्रमांक १९,२२ (२), ५३(ग) व ५८(ड) या पोटनियमात बदल करण्यास व पोटनियम क्रमांक ३९(ग) व ५३ (घ) हे नव्याने अंतर्भुत करण्यास भारतीय रिझर्व्ह बँकेकडून अद्याप मंजूरी प्राप्त न झाल्याने सदर पोटनियम मंजूरीकरीता पुन:श्च सादर करण्यास तसेच पोटनियम क्रमांक ११(२) यामध्ये बदल करून सुधारीत पोटनियमास मंजूरी देणे.

८) मध्यम मुदतीच्या कर्जदार सभासदांना जीवन विमा संरक्षण देण्यासाठी मंजूरी देणे.

९) ७२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील सभासदांची गैरहजेरी माफ करणे.

१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने, नियमांस अनुसरुन, आयत्यावेळी येणाऱ्या कामकाजाचा विचार करणे.

**संचालक मंडळाच्या हुकूमावरुन**

**ठिकाण : मुंबई** **वि.ही. रावदका**

**दिनांक : १६.०८.२०२४** **महाव्यवस्थापक**

# सूचना

१) सर्वसाधारण सभेच्या निश्चित केलेल्या वेळी गणसंख्या पूर्ण न झाल्यास सभा तहकूब करण्यात येईल. अशी तहकूब झालेली सभा त्यानंतर अर्ध्या तासाने त्याच दिवशी, त्याच ठिकाणी घेण्यात येईल व आवश्यक त्या गणसंख्येच्या अभावीसुध्दा कामकाजाचा विचार केला जाईल.

२) सभासदांना वरील कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाजासंबंधी काही माहिती हवी असल्यास त्यांनी कामाच्या वेळेत, मुख्य कार्यालयात, महाव्यवस्थापक यांना पूर्वसूचनेनुसार भेटावे.

३) वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुलभ होण्याच्या दृष्टीने सभासदांनी त्यांना हव्या असलेल्या माहितीबाबत सभेपूर्वी ७ दिवस अगोदर लेखी सूचना द्यावी व सभेच्या वेळी संबंधीत विषयावरील चर्चा चालू असताना त्याबाबत विचारणा करावी. आयत्यावेळी विचारलेली माहिती देणे शक्य होणार नाही.

४) दिनांक १८.०८.२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत त्याचप्रमाणे सन २०२३-२०२४ चा वैधानिक हिशेब तपासनीसांचा अहवाल व सन २०२२-२०२३ चा वैधानिक हिशेब तपासणी अनुपालन अहवाल सभासदांच्या अवलोकनासाठी दिनांक १६.०८.२०२४ पासून कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत बँकेच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात येईल. तसेच बँकेच्या सर्व शाखांमध्ये मागील सभेच्या इतिवृत्तांताच्या प्रती दिनांक १६.०८.२०२४ पासून सभासदांच्या अवलोकनासाठी कामाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत ठेवण्यात येतील.

५) ज्या सभासदांनी त्यांचा ई-मेल आय.डी. किंवा मोबाईल क्रमांकाची बँकेकडे नोंद केली नसेल त्यांनी त्याबाबतची माहिती संबंधीत शाखा कार्यालयात त्वरीत सादर करावी.

६) बँकेच्या www.municipalbankmumbai.com या वेबसाईटवर ७२ वा वार्षिक अहवाल सभासदांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात येत आहे.